**MHBI110025892025**

## नियमित दिवाणी दावा क्र. ५२५/२०२५ मधील निशाणी १५ खालील आदेश

सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता **आदेश ६ नियम १७** अन्वये दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादीमध्ये मध्यस्थी मार्फत वाद संपुष्टात आलेला आहे सबब याकामी तडजोड पुरसिस अभिलेखावर दाखल करावयाची आहे मात्र तत्पूर्वी मूळ दाव्यात काही दुरुस्त्या करणे गरजेचे आहे. वादीने या दाव्याकामी खालील दुरुस्त्या मागितल्या,

१. दाव्याची मागणी मालकी हक्क जाहीर करुन निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत ऐवजी वादग्रस्त मिळकतीचे सरसनिरस वाटप करुन स्वतंत्र ताबा मिळणेबाबत दुरुस्त करणे.

२. परिच्छेद क्र.३ मधील ओळ क्र.७ मध्ये वादीचा २/३ एवढा अविभक्त हिस्सा तसेच ओळ क्र.१७ मध्ये **आतापर्यंतचा सर्व** हा मजकूर समाविष्ट करणे गरजेचे आहे.

३. परिच्छेद क्र.३ नंतर ३अ हा अर्जात नमूद केलेला मजकूर नमूद करणेबाबत.

४. दाव्याच्या विनंती कलमामध्ये ब कलमातील मजकूर वगळून अर्जात नमूद केल्याप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेबाबत.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.11 17:13:24 +0530

५. मूळ दाव्याच्या परिच्छेद क्र.७ मध्ये वाटपाच्या मागणी संदर्भात दुरुस्ती करणे संदर्भात.

६. मूळ दाव्याच्या विनंती कलमामध्ये कलम क मधील मजकूर वगळून ड व इ अक्षरे वगळून अनुक्रमे क आणि ड असे नमूद करणेबाबत.

२. वर नमूद दुरुस्त्या तडजोडीकामी आवश्यक असल्याने शिवाय या दुरुस्ती केल्याने दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होत नसल्याने ही दुरुस्ती करण्याची परवानगी दयावी अशी विनंती वादीच्या विधीज्ञांनी केली.

३. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे दाखल करत योग्य तो आदेश पारीत करावा असे कथन केले.

४. दुरुस्तीचे स्वरुप पाहता निश्चीतच मूळ दाव्याच्या स्वरुपात आमूलाग्र बदल घडत आहे. सुरुवातीला दावा मालकी हक्क जाहीर करुन मिळणेबाबत असल्याने त्याला रक्कम रु.२००/– ची कोर्ट फी वादीने भरलेली आहे. मात्र दावा आजरोजी दुरुस्त केल्यास दाव्याची मागणी ही वाटपाची असल्याने त्यानुसार कोर्ट फी भरणे गरजेचे आहे. निश्चीतच वादी प्रतिवादीमध्ये न्यायालया बाहेर वाटप झाल्याने दावा दुरुस्ती केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही. वादी क्र.१ व २ या मयत राजेंद्र मोटे यांच्या सख्ख्या बहिणी आहेत व प्रतिवादी ही राजेंद्र मोटे यांची पूर्वाश्रमीची पत्नी आहे. सबब पक्षकारांचे संबंध पाहता दाव्याची मागणी पाहता दावा दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित ठरेल. मात्र त्याचबरोबर वादीला दुरुस्त दाव्या संदर्भात आवश्यक ती कोर्ट फी भरणे बंधनकारक असेल. सबब पुढील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.11 17:13:30 +0530

## – <u>आदेश</u> –

१. अर्ज निशाणी १५ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने नि.१ येथे आदेशाअन्वये दावा दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत अभिलेखावर दाखल करावी.

३. दावा दुरुस्तीनंतर वादीने आवश्यक ती कोर्ट फी न्यायालयामध्ये जमा करावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.11 17:13:35 +0530

**(श्रुती ह. पाटील )**

**दि. ११/०३/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर गेवराई**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 11/03/2026 |
| Transcribed on | :- | 11/03/2026 |
| Checked & signed on | :- | 11/03/2026 |

Sd/-

(P.B. Kusumkar)

Stenographer G-3,Georai.